—: प्रेसनोट :— दिनांक : १७.०७.२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २७/२०१८ |
| कलम | कलम ७, १५ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | १) अमोल अजयसिंग जाधव, वय २९वर्षे, हुद्दा — कनिष्ठ अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका, 'के' पश्चिम, अंधेरी (पश्चिम), मुंबई.<br>२) आनंद रमेश नेरूरकर, वय ३६ वर्षे, हुद्दा — दुय्यम अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका, 'के' पश्चिम, अंधेरी (पश्चिम), मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ३,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी काम करीत असलेल्या सलूनमध्ये अनधिकृत बांधकाम चालू असून ते बंद करण्याबाबत बृहन्मुंबई महानगर पालिका, 'के' पश्चिम विभागाकडून नोटीस प्राप्त झाली होती. नोटीसच्या अनुषंगाने सलून मालकाने फिर्यादीला पालिकेतील संबंधीत अधिकाऱ्यांना भेटण्यास सांगितले. फिर्यादी हे लोकसेवकांना भेटले असता त्यांनी सदरचे प्रकरण मिटवून टाकण्यासाठी लाच द्यावी लागेल असे फिर्यादीला सांगितले.<br>फिर्यादीला लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे तक्रार केली. तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता लोकसेवक अमोल जाधव यांनी फिर्यादीकडे रू. ३,००,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. व तडजोडीअंती लोकसेवक आनंद नेरूरकर यांनी फिर्यादीकडे रू. २,००,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच आरोपी लोकसेवक अमोल अजयसिंग जाधव, कनिष्ठ अभियंता व आनंद रमेश नेरूरकर, दुय्यम अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका, 'के' पश्चिम, अंधेरी (पश्चिम), मुंबई, यांनी त्याच्या पदाचा गैरवापर करून फिर्यादीचे अनधिकृत बांधकामचे प्रकरण मिटवून टाकण्यासाठी बेकायदेशीर मार्गाने आर्थिक स्वरूपात लाभ घेण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांचे विरूध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
टोलफ्री क्र.१०६४,दूरध्वनी क्र.०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
व्हॉटस ॲप क्रमांक — ९९३०९९७७००

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( एम.एन.मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.